# <u>प्रेसनोट</u>

दि. २३/०१/२०२४

**अलंकार पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील पोलीस उपनिरीक्षक व खाजगी इसम वकील यांचेवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | अलंकार पोलीस स्टेशन, पुणे शहर. गु.र.नं. १२/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ, १२. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३४ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) गणेश वसंत चव्हाण, वय ३५ वर्ष, पद - पोलीस उपनिरीक्षक (वर्ग-२), नेमणुक - अलंकार पोलीस स्टेशन, पुणे शहर.<br>२) राहुल जयसिंग फुलसुंदर, वय ३१ वर्ष, व्यवसाय - वकील, रा. कोथरुड, पुणे. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,००,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ४०,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ४०,०००/- रुपये (चाळीस हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | २२/०१/२०२४ |
| सापळा दिनांक | २२/०१/२०२४ |

ठिकाण :- मिर्चमसाला हॉटेलच्या समोर फुटपाथवर, कर्वे रोड, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या भावाच्या विरुद्ध अलंकार पोलीस स्टेशन येथे माहे जानेवारी २०२४ मध्ये फसवणुकीचा गुन्हा दाखल असून, सदर गुन्ह्याचा तपास अलंकार पो.स्टे. चे पोलीस उपनिरीक्षक गणेश चव्हाण हे करीत होते. लोकसेवक गणेश चव्हाण यांनी तक्रारदार यांचेकडे सदर गुन्ह्यात त्यांचे भावाला अटक न करण्यासाठी व गुन्ह्याचे तपासात मदत करणेसाठी ५,००,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक क्र. १ गणेश चव्हाण यांचेकरीता आरोपी क्र. २ वकील राहुल फुलसुंदर यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती ४०,०००/- रुपये लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन, खाजगी इसम आरोपी क्र. २ वकील राहुल फुलसुंदर यांनी तक्रारदार यांचेकडून रक्कम रुपये ४०,०००/- (चाळीस हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. आरोपी लोकसेवक क्र. १ गणेश चव्हाण यांनी आरोपी क्र. २ वकील राहुल फुलसुंदर याना लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिले म्हणून त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध अलंकार पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.